सोमवार, २७ ऑगस्ट २०१८

तरुण भारत

# वाचनातून सामाजिक बांधिलकीची भावना वाढीस!



**दोडामार्ग : डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील. बाजूला प्राध्यापक.**

वार्ताहर
झरेबांबर

विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन करून बदलत्या प्रवाहानुसार आधुनिक स्वरुपाचे ज्ञान आत्मसात करून वैचारिक प्रगल्भता वाढविली पाहिजे. छापील स्वरुपातील ग्रंथाबरोबरच डिजिटल साहित्याचेही वाचन केले पाहिजे. मोबाईलमुळे जगाचे ज्ञान आपल्या मुठीत आले आहे. त्यासाठी सकारात्मकदृष्टीने ज्ञान वृद्धीसाठी वापर करून घेण्याची गरज आहे. वाचन केल्यामुळे सामाजिक बांधिलकीची भावना वाढीस लागते, असे उद्गार लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी काढले. महाविद्यालयात आयोजित केलेल्या भारतीय ग्रंथालय शासत्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती समारोहप्रसंगी ते प्रमुख अतिथी या नात्याने बोलत होते.

ग्रंथालय विभागातर्फे आयोजित केलेल्या डॉ. रंगनाथ यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात वेगवेगळ्या लेखकाची पुस्तके, संदर्भग्रंथ, सामाजिक शास्त्रे व इतर ग्रंथांचे प्रदर्शन करण्यात आले होते. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी ग्रंथप्रदर्शनास भेट दिली.

**प्राचार्य डॉ. व्ही. ए.पाटील यांचे प्रतिपादन**

या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व डॉ. रंगनाथ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल प्रा. रामकिसन मोरे यांनी केले. आभार दिलीप बर्वे यांनी मानले. यावेळी ग्रंथालय सल्लागार समितीचे सदस्य प्रा. डॉ. प्रल्हाद गाथाडे, प्रा. दिलीप बर्वे, प्रा. डॉ. राजेंद्र इंगळे, प्रा. सोपान जाधव, मुख्य लिपीक योगेश ठाकुर, कल्पेश गवस आदी उपस्थित होते.